पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी,
पुणे – ४११ ०१७
जा.क्र.ड/१३/कावि/ ८० /२०१८
दिनांक– १३ /०३/ २०१८

प्रति,
मा.श्री/श्रीमती -----------------------------
------------------------------------------
------------------------------------------

विषय :- ड प्रभाग समितीची मासिक सभा कार्यपत्रिका क्र. ९
दिनांक १६ /०३ /२०१८

महोदय,

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे मार्च २०१८ ची मासिक सभा ड क्षेत्रीय कार्यालयाचे “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे शुक्रवार दिनांक १६/०३/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.

सदर सभेमध्ये सोबत जोडलेल्या कार्यपत्रिकेप्रमाणे कामकाज करण्यात येईल. सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा सचिव,**
**सभाशाखा,**
ड क्षेत्रीय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे-१७

सोबत - कार्यपत्रिका क्र: ९
दिनांक:- १६ /०३ /२०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे-१७**

**ड प्रभाग समिती,**

**कार्यपत्रिका क्र. ९**

दिनांक १६ /०३ /२०१८ वेळ दुपारी १२. ०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड प्रभाग समितीची माहे मार्च २०१८ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक १६/०३/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. रहाटणी येथील ड क्षेत्रीय कार्यालयाचे "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजित केलेली आहे. सभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज होईल.

१) मागील सभा कार्यपत्रिका क्र. ७ माहे फेब्रुवारी १८ व विशेष समिती सभा कार्यपत्रिका क्र. ८ चा सभावृत्तांत कायम करणे

२) पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडेन्सी शेजारील स.नं. १३०, १३२,१३३,१३४ पैकी महापालिकेचे उद्यान आरक्षण क्र. ३७१ ब प्रमाणे उद्यान विकसित करण्यात येत आहे. या उद्यानाला शोभेल असे "राजमाता जिजाऊ उद्यान" नामकरण करणेचा प्रस्ताव

३) मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ८३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून दक्षिण बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्ट्यातुन १२.० मीटर रुंद रस्ता सर्व्हे नं. ८३,८८ व १३९ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचा प्रस्ताव

४) मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ७३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून उत्तर बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्ट्यातुन १२.० मीटर रुंद रस्ता सर्व्हे नं. ७३व ७२ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेचा प्रस्ताव

५) मौजे वाकड सर्व्हे नं. १७८/१, प्रभाग क्र. २६ भिंगारे कॉर्नर शेजारील गल्लीस सम्राट कॉलनी हे नाव स्थानिक रहिवाशी यांच्या मागणीनुसार घोषित करणेचा प्रस्ताव

६) मा. सभापती ड प्रभाग समिती यांचे सुचनेनुसार करावयाचे कामकाज

सही/-

**प्रशासन अधिकारी, तथा सचिव, सभाशाखा**

ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी, पुणे-१७

जा.क्र.ड/१३/कावि/ ८१ /२०१८

दिनांक : १३ /०३/२०१८